MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.
CIN No.U40109MH2005SGC153646

# महापारेषण समाचार

● वर्ष : १९ अंक : ६ पाने : ८ ● ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४ www.mahatransco.in ● Follow us on :

**प्रिय कर्मचारी बंधू आणि भगिनींनो,**

सद्यस्थितीत आपली पारेषणप्रणाली सतत कार्यरत ठेवण्याच्या कामांपेक्षा रूपांतरण (Transformation) करण्याचे काम मोठ्या प्रमाणात करावे लागत आहे. आपणा सर्वांना माहित आहे की, देशात इतर कोणत्याही राज्यांपेक्षा आपल्या महाराष्ट्रात विजेच्या पायाभूत सुविधांचे जाळे अधिक व्यापक असून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आपण पोहोचत आहोत. या पायाभूत सुविधांची व्याप्ती विचारात घेतल्यास ही संपूर्ण यंत्रणा योग्यरित्या कार्यरत ठेवणे, आपण तिची देखभाल करणे आणि त्यासोबत विविध कामांचे प्रकल्प उभारणे व चालविणे ही कामे खूप आव्हानात्मक आहेत.

- **भविष्यात विजेची मागणी वाढणार**
- **यंत्रणेचे सक्षमीकरण गरजेचे**
- **कामे गतीने करा**
- **सांघिक भावनेने काम करा**

यासाठी वीज क्षेत्रात काम करणारे अभियंते आणि वीजतंत्रज्ञ यांचेवर राष्ट्राच्या उभारणीत आणि आर्थिक प्रगतीत मोठा वाटा उचलण्याची जबाबदारी आहे. भारताच्या आर्थिक सर्वेक्षणातून असे स्पष्ट झाले आहे की, देशातील विजेची मागणी ही प्रचंड वाढणार आहे. त्यामुळे ही मोठी मागणी पूर्ण करण्यासाठी आपल्या पायाभूत रचना सक्षम ठेवण्याची गरज आहे, म्हणून विजक्षेत्राच्या तिन्हीही कंपनीत म्हणजेच निर्मिती, पारेषण आणि वितरण यांच्या कामात वाढत्या वीजमागणीचा अंदाज घेणे, त्यासाठी नियोजन आणि आर्थिक तरतूद (Budgeting) करणे या बाबी महत्त्वाच्या आहेत. प्रथम नियोजन करून त्यानुसार वीज देण्याची कार्यवाही केली पाहिजे. नियोजन आणि अंमलबजावणी या दोन महत्त्वांच्या घटकांवर कुठल्याही कंपनीचे यश अवलंबून असते. यासाठी आपल्या मत्तांचा भांडवली उपयोग केला पाहिजे. अकार्यक्षमता असल्यास किंवा सध्या चालू असलेले कार्य पुरेसे आहे, असे मानले तर त्यापुढे आपली कामगिरी आणि वित्तीय फलप्राप्ती या दोन्हीमध्ये घसरण होईल.

म्हणून आपल्या सर्व कार्यक्षेत्रात नियोजन आणि अंमलबजावणी यांचे योग्य व्यवस्थापन असले पाहिजे. सर्व कामात नियोजनबध्दता व कार्यवाही योग्य प्रकारे केल्यास त्याच्या एकत्रित परिणामांमुळे कंपनीच्या संपूर्ण कामगिरीत सकारात्मकता दिसून येईल.

नियोजन आणि कार्यवाही यानंतर इतर विषयातही आव्हाने आहेत. यंत्रणा अधिक स्वयंचलित (Automation) करणे, नवीन कल्पना विकसित करणे, अंदाज बांधणे व उभारणी करणे, सर्व साधने मिळविणे, संपर्क व्यवस्थापन प्रभावी करणे, नियमने आणि वाणिज्यिक क्षेत्र, कायद्याचे पालन, वित्त व लेखा तसेच मानव संसाधन व्यवस्थापन या सर्व क्षेत्रात आव्हाने आहेत. विजेच्या तिन्हीही क्षेत्रात आव्हाने आहेतच, या आव्हानांचे स्वरूप, त्यांची भूमिका ही गरज आणि महत्त्व यांच्यानुसार बदलू शकते.

आपल्या तिन्हीही कंपन्यांमध्ये (महानिर्मिती, महापारेषण आणि महावितरण) कामांत सतत आव्हाने निर्माण होत आहेत. त्यासाठी विशेष ज्ञान व कौशल्ये विकसित करणे आवश्यक आहे. वीज अभियंत्याच्या कौशल्यामध्ये विकासाला वाव आहे. परंतु, त्यांच्यात वैशिष्ट्यपूर्ण ज्ञान व कौशल्याचा अभाव जाणवतो. आपणास वैशिष्ट्यपूर्ण ज्ञानाच्या माहितीसाठी सल्लागार संस्था/बहुराष्ट्रीय कंपन्या यांच्यावर अवलंबून राहावे लागते, ते आपल्याला टाळता आले पाहिजे.

आपण फक्त सध्याच्या काळासाठी काम करतो, त्याऐवजी भविष्याचा विचार करून आपण काम केले पाहिजे. पायाभूत क्षेत्रामध्ये कार्यरत आहोत, म्हणून आपण भविष्यासाठी काम करण्याची दृष्टी बाळगली पाहिजे. किंबहूना, तशी सवय लावून घेतली पाहिजे. आपला दृष्टीकोन आणि संवेदनशीलता यात परिपूर्णता आणून त्याचा वापर आपल्या कामात दिसला पाहिजे.

अशा प्रकारे वीज अभियंत्यांची भूमिका आपल्या कंपनीचा व्यवसाय नीट समजावून



**डॉ. संजीव कुमार** (भा.प्र.से.)
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

घेण्याचा असला पाहिजे. त्यात कार्यपध्दती आणि प्रक्रिया यांना पहिले स्थान आहे. त्यानंतर ज्या क्षेत्रात आपणास काम करण्याची संधी दिली आहे, त्यातील वैशिष्ट्यपूर्ण ज्ञान आपण मिळविले पाहिजे. संचलन व सुव्यवस्था, प्रकल्प, स्वयंचलन, अभिकल्प किंवा संकल्प चित्र तयार करणे, अंदाज तयार करणे, उभारणी, साधनांची खरेदी करणे, पुरवठ्याची साखळी, संपर्क व्यवस्थापन, नियमने, वाणिज्य आणि न्यायालयीन कार्यपध्दती, वित्त व लेखा, मानव संसाधन विकास व व्यवस्थापन या सर्व क्षेत्रात सतत काम करणे आणि वैशिष्ट्यपूर्ण ज्ञान मिळविणे या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत.

आपल्या प्रयत्नांची माहिती दिल्यानंतर आणि राष्ट्रउभारणीमध्ये आपण सर्वांनी स्थान मिळविल्याबद्दल व त्यात आपण करीत असलेल्या योगदानाबद्दल मी सर्वांचे अभिनंदन करतो. आपल्या प्रत्येकांकडून आपली भूमिका, जबाबदारी, तसेच कर्तव्ये याविषयी माझ्या खूप अपेक्षा आहेत. त्या आपण नक्की पूर्ण कराल, असा विश्वास आहे.

**शुभेच्छांसह..!**

**- डॉ. संजीव कुमार**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक



**रायपूर :** येथे पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने महापारेषणच्या जनसंपर्क विभागाला लोकसभेचे माजी सदस्य डॉ. नंदकुमार साय यांच्या हस्ते दोन पारितोषिके देण्यात आली. पारितोषिके स्वीकारताना महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे. शेजारी 'पीआरएसआय'चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अजित पाठक, सचिव डॉ. पीएलके मूर्ती, डॉ. यू.एस. शर्मा, डॉ. समीर गोस्वामी, रायपूर चॅप्टरचे अध्यक्ष डॉ. शाहिद अली व अन्य पदाधिकारी.

▶ सर्वोत्कृष्ट सोशल मीडिया अँन्ड पीआर; भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय जागृती अभियान विशेष पुरस्कार

# पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाची महापारेषणला दोन राष्ट्रीय पारितोषिके प्रदान

Follow us on :

पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडियाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील पारितोषिकांचे वितरण लोकसभेचे माजी सदस्य डॉ. नंदकुमार साय व छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री श्री. विजय शर्मा यांच्या हस्ते झाले. यामध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) जनसंपर्क विभागाला सर्वोत्कृष्ट सोशल मीडिया ऍन्ड पीआर, ब्रँडिंग व भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी राष्ट्रीय जागृती अभियान हा विशेष पुरस्कार मिळाला. महापारेषणचे जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या पारितोषिकांबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी जनसंपर्क विभागाचे अभिनंदन केले.

छत्तीसगडमधील रायपूरच्या हॉटेल बेबीलॉन इंटरनॅशनलमध्ये आयोजिलेल्या ४७ व्या भारतीय जनसंपर्क परिषदेच्या समारंभात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी 'पीआरएसआय'चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अजित पाठक, सचिव डॉ. पीएलके मूर्ती, डॉ. यू. एस. शर्मा, डॉ. समीर गोस्वामी, रायपूर चॅप्टरचे अध्यक्ष डॉ. शाहीद अली यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

## जनसंपर्क विभाग आघाडीवर

महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी यशाचे संपूर्ण श्रेय जनसंपर्क विभाग व त्यांच्या टीमवर्कला दिले आहे. सृजनशील व नावीन्यपूर्ण काम व मीडियात सातत्याने होणारे नवे बदल समजून जनसंपर्क विभागाने कामांमध्ये वैविध्यता आणून सकारात्मक बदल केले. विशेषतः सोशल मीडियाव्दारे (फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, यू-ट्यूब, टेलिग्राम, थ्रेडस) जनसंपर्क विभागाने महापारेषणची भूमिका लोकांसमोर सकारात्मकपणे ठळकपणे मांडली. भविष्यातही, महापारेषणचा जनसंपर्क विभाग सातत्यपूर्ण अभिनव कामगिरी करून महापारेषणचे नाव उंचावेल, असा विश्वास व्यक्त केला.

आमच्याशी कनेक्टेड रहा
@maha_transco
@maha_transco
MahaTransco
MahaTransco
Mahatranscoltd
MahaTransco

### अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांनी केले अभिनंदन

# महापारेषणच्या राज्य भार प्रेषण केंद्राला सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल दोन राष्ट्रीय पुरस्कार

Follow us on :

विजेच्या उपलब्धतेनुसार पुरवठा व त्याचे नियंत्रण करण्यासाठी नावीन्यपूर्ण योजनांची यशस्वी अंमलबजावणी केल्याबददल महापारेषणच्या महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोलीला देशातील सर्वोत्कृष्ट भार प्रेषण केंद्र व ओपन ॲक्सेस (एसएलडीसी) या दोन राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले. या पुरस्काराबद्दल महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी अभिनंदन केले आहे.

इंडिपेंडेन्ट पॉवर प्रोड्युसर्स असोसिएशन ऑफ इंडिया (आयपीपीएआय) या राष्ट्रीय संस्थेने बेळगावमध्ये हा पुरस्कार सोहळा आयोजित केला होता. देशभरातील विद्युत कंपन्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करून हे पुरस्कार दिले.

याप्रसंगी केंद्रीय विद्युत प्राधिकरणचे अध्यक्ष श्री. घनश्याम प्रसाद, महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाचे माजी अध्यक्ष श्री. व्ही. राजा, केंद्रीय विद्युत प्राधिकरणचे माजी अध्यक्ष श्री. राकेशनाथ, ग्रीड इंडियाचे माजी व्यवस्थापकीय संचालक श्री. एस के. सोनी यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण झाले. या वेळी महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोलीचे अधीक्षक अभियंता श्री. मिलिंद देवळे, श्री. उमेश भगत, उपमहाव्यवस्थापक श्री. नितीन पौनीकर, सहाय्यक महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. आनंद दळवी, कार्यकारी अभियंता श्री. दिनेश पाटील, व्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. योगेश अघोर, सहाय्यक अभियंता श्री. विजय कांबळे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

या पुरस्कारासाठी महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्राचे कार्यकारी संचालक श्री. शशांक जेवळीकर, मुख्य अभियंता श्री. गिरीश पंतोजी यांचे मार्गदर्शन लाभले.



**बेळगाव :** महापारेषणच्या महाराष्ट्र राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोलीला देशातील सर्वोत्कृष्ट भार प्रेषण केंद्र व ओपन ॲक्सेस (एसएलडीसी) या दोन राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले. याप्रसंगी अधीक्षक अभियंता श्री. मिलिंद देवळे, श्री. उमेश भगत, उपमहाव्यवस्थापक श्री. नितीन पौनीकर, सहाय्यक महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. आनंद दळवी, कार्यकारी अभियंता श्री. दिनेश पाटील, व्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. योगेश अघोर, सहाय्यक अभियंता श्री. विजय कांबळे

### राज्यस्तरीय टेनिक्वाईट स्पर्धेत नागपूर परिमंडळाचा विजय

# समिधा लीलाधर लोहरे यांनी पटकावले रौप्यपदक

Follow us on :

बारामती येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील टेनिक्वाईट क्रीडा प्रकारात समिधा लीलाधर लोहरे यांनी रौप्यपदक पटकावले आहे. त्यांनी मागील चार वर्षापासून सातत्याने नागपूर परिमंडळाचा विजय कायम राखला आहे. या यशाबद्दल वीज कंपन्यांमधील अधिकारी आणि क्रीडाप्रेमींकडून त्यांचे कौतुक होत आहे.

समिधा लोहरे ह्या एक कुशल टेनिक्वाईटपटू तसेच नाटकात विविध भूमिका साकारणाऱ्या अष्टपैलू अभिनेत्री देखील आहे. नुकत्याच पार पडलेल्या महावितरण बारामती परिमंडळ २०२४-२५ राज्यस्तरीय टेनिक्वाईट स्पर्धेत त्यांनी रौप्यपदक जिंकून मोठे यश संपादन केले आहे. या बद्दल संपूर्ण महावितरण कुटुंब आणि क्रीड़ाप्रेमींच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

राज्यस्तरीय टेनिक्वाईट स्पर्धेच्या सांघिक खेळात समिधा लीलाधर लोहरे यांना मनीषा चौकसे आणि नेहा हेमने यांनी मोलाची साथ दिली. तर श्री. दोडके, श्री. विटणकर व श्री. लहाने यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

त्यांचे पती श्री. लीलाधर लोहरे हे महापारेषण कंपनीत कार्यकारी अभियंतापदी कार्यरत आहेत. दरम्यान, २०२४ मध्ये राष्ट्रीय स्तरावर कुरुक्षेत्र येथे झालेल्या "आंतरराज्य स्पर्धेत" समिधा लोहरे यांनी महावितरण कंपनीला रौप्य पदक मिळवून दिले होते.





@maha_transco MahaTransco @Mahatranscoltd www.mahatransco.in

### ▶ श्री. अरविंद जगताप यांनी केले नाट्यकलेचे महत्त्व विषद

# महापारेषणची आंतरमंडलीय नाट्य स्पर्धा जल्लोषात

Follow us on :

``राजकारणातून व समाजकारणातून ज्या राजकीय व सामाजिक जनजागृतीच्या गोष्टी आपण जनसामान्यांपर्यंत पोहोचवू शकत नाही, ते काम नाटकांमार्फत सहज शक्य होते``, अशा शब्दात सुप्रसिध्द चित्रपट कथा आणि पटकथा लेखक, नाटककार आणि "चला हवा येऊ द्या" या लोकप्रिय कार्यक्रमातील पत्रलेखक श्री. अरविंद जगताप यांनी नाट्यकलेच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. यावेळी त्यांनी महिलांविषयी आदरभाव निर्माण करणाऱ्या पत्रांचे वाचन करत श्रोत्यांची मने जिंकली.

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या छत्रपती संभाजीनगर आंतरमंडलीय नाट्य स्पर्धा संत एकनाथ रंगमंदिर, उस्मानपुरा येथे मोठ्या जल्लोषात पार पडली. या नाट्यस्पर्धेचे उद्घाटन श्री. अरविंद जगताप यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. पहिल्या दिवशी सकाळी "अनपेक्षित" आणि सायंकाळी "एका खटल्याची साक्ष" ही नाटके सादर झाली. दोन्ही नाटकांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवले. दुसऱ्या दिवशी सकाळी "टेक अ चान्स" आणि दुपारी "आज महाराष्ट्र दीन आहे" ही नाटके सादर झाली.

सायंकाळी आयोजिलेल्या पारितोषिक वितरण सोहळ्यासाठी महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर उपस्थित होते. कर्मचाऱ्यांचा रंगमंचावरील नाट्यकलेचा अविष्कार पाहून त्यांनी नाट्य कलाकारांचे भरभरून कौतुक केले. पारितोषिक पटकावलेल्या सर्व कलाकारांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेच्या उद्घाटन सोहळ्यासाठी मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे उपस्थित होते.

अत्यावश्यक सेवा क्षेत्रात काम करताना कर्मचाऱ्यांच्या मनावर येणारा ताण कमी व्हावा व दैनंदिन कामात थोडासा विरंगुळा मिळावा तसेच कर्मचाऱ्यांच्या अंगी असणाऱ्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, यासाठी महापारेषण कंपनी एक वर्ष नाट्य स्पर्धा व दुसऱ्या वर्षी क्रीडा स्पर्धा अशा पध्दतीने दर दोन वर्षाला नाट्यस्पर्धेचे व क्रीडा स्पर्धेचे आयोजन करत असते. कंपनीच्या या धोरणानुसार या वर्षी नाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर परिमंडळातील विद्युत कर्मचाऱ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवून आपल्या कसदार अभिनयाने आंतर मंडलीय नाट्य स्पर्धेव्दारे रसिकांची मने जिंकली.

नाट्य संघाच्या वतीने श्री. प्रजित नाईकवाडे, श्री. घनश्याम गायकवाड, श्रीमती श्रध्दा धनगे, श्री. आकाश कळसे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर आंतरमंडलीय नाट्य स्पर्धा कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधीक्षक अभियंता श्री. संजीव कांबळे यांनी केले. त्यांनी कर्मचाऱ्यांमध्ये सुसंवाद आणि कला जपण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी होते. त्यांनी आपल्या भाषणात सर्व सहभागी कलाकारांचे अभिनंदन केले. विद्युत क्षेत्रातील प्रत्येक कर्मचारी कुठलेही काम न थांबवता यशस्वीपणे नाट्यस्पर्धाही पार पाडतात, याबद्दल कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती कल्याणी कुरकुटे, श्रीमती स्वप्ना मादनीकर, श्रीमती रोहिणी घनबहादूर यांनी केले तर आभार श्री. सुयोग बानाईत यांनी मानले.

या स्पर्धेच्या यशस्वितेकरिता नाट्यस्पर्धा आयोजन समितीचे सचिव अधीक्षक अभियंता श्री. संजीव कांबळे, श्री. रंगनाथ चव्हाण, श्री. संजीव कुमार सुरडकर, श्री. दत्ता जाधवर, श्रीमती अंजना ठक्कर, श्रीमती मंजुषा दुसाने, श्रीमती स्वाती यंबल व आयोजन समितीतील सर्व कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंते, सर्व तांत्रिक अधिकारी कर्मचारी, मानव व संसाधन अधिकारी कर्मचारी, वित्त व लेखा अधिकारी व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.



**छत्रपती संभाजीनगर :** महापारेषणच्या छत्रपती संभाजीनगर आंतरमंडलीय नाट्य स्पर्धेच्या उदघाटनप्रसंगी सुप्रसिध्द चित्रपट कथा आणि पटकथा लेखक, नाटककार श्री. अरविंद जगताप. शेजारी छत्रपती संभाजीनगर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे, अधीक्षक अभियंता श्री. संजीव कांबळे, श्री. रंगनाथ चव्हाण, श्री. संजीव कुमार सुरडकर, श्री. दत्ता जाधवर, श्रीमती अंजना ठक्कर, श्रीमती मंजुषा दुसाने, श्रीमती स्वाती यंबल





**छत्रपती संभाजीनगर :** महापारेषणच्या छत्रपती संभाजीनगर आंतरमंडलीय नाट्य स्पर्धेत विजेत्या संघासमवेत महापारेषणचे संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर. शेजारी छत्रपती संभाजीनगर परिमंडळाचे मुख्य अभियंता श्री. नसीर कादरी, अधीक्षक अभियंता श्री. संजीव कांबळे, श्री. रंगनाथ चव्हाण, श्री. संजीव कुमार सुरडकर, श्री. दत्ता जाधवर, श्रीमती अंजना ठक्कर, श्रीमती मंजुषा दुसाने, श्रीमती स्वाती यंबल

## नाट्यस्पर्धेचे निकाल

**नाटक**
टेक अ चान्स (प्रथम), अनपेक्षित (व्दितीय)

**दिग्दर्शन**
टेक अ चान्स (प्रथम), अनपेक्षित (व्दितीय)

**स्त्री अभिनय**
टेक अ चान्स (शिप्रा पहुरकर) (प्रथम)
टेक अ चान्स (मयुरी जावळेकर) (व्दितीय)

**पुरुष अभिनय**
टेक अ चान्स (प्रजित नाईकवाडे) (प्रथम)
अनपेक्षित (स्मीत पुनवटकर) (व्दितीय)

**नेपथ्य**
अनपेक्षित (प्रथम, टेक अ चान्स (व्दितीय)

**प्रकाश योजना**
अनपेक्षित (प्रथम), प्रकाश योजना (व्दितीय)

**संगीत**
टेक अ चान्स (प्रथम),
आज महाराष्ट्र दीन आहे (व्दितीय)

**रंगभूषा-वेशभूषा**
अनपेक्षित (प्रथम),
आज महाराष्ट्र दीन आहे (व्दितीय)

**लक्षवेधी भूमिका**
१) नटवर जैन-एका खटल्याची साक्ष
२) मोनिका उजागरे-टेक अ चान्स

**उत्तेजनार्थ अभिनय**
१) आर. पी. चव्हाण-एका खटल्याची साक्ष
२) शशिकांत इंगळे-अनपेक्षित
३) दीपक वानखेडे-टेक अ चान्स
४) शिरीष तीर्थकर-आज महाराष्ट्र दीन आहे

**बालकलाकार**
१) ओवी गोडबोले, २) समीक्षा मेंढे

## वीज कर्मचाऱ्यांच्या कार्याला सॅल्यूट-अभिनेता श्री. अंकित मोहन

या कार्यक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे या सोहळ्यासाठी प्रसिध्द अभिनेता श्री. अंकित मोहन यांना आमंत्रित केले होते. जीवन जगायला अन्न वस्त्र व निवारा यांची जेवढी आवश्यकता आहे, त्यापेक्षा जास्त आवश्यकता आज विजेची आहे, अशा शब्दात त्यांनी विजेचे महत्त्व अधोरेखित केले. विद्युत क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्यांसाठी व त्यांच्या कार्याला माझा सॅल्यूट आहे, असे सांगून विद्युत कर्मचाऱ्यांच्या कामांचा गुणगौरव केला.

Women Power ▶ महापारेषणचे संचालक (मा.सं.) श्री. सुगत गमरे यांनी केले अभिनंदन

# ऑल इंडिया इलेक्ट्रिसिटी स्पोर्टस कंट्रोल बोर्डाच्या बुध्दीबळ स्पर्धेत महापारेषणने पटकाविले कांस्यपदक

Follow us on :



बडोदा (गुजरात) येथे ४६ व्या ऑल इंडिया इलेक्ट्रिसिटी स्पोर्टस कंट्रोल बोर्डतर्फे घेण्यात आलेल्या बुध्दीबळ व बॅडमिंटन स्पर्धेत महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) महिला बुध्दीबळ संघाने कांस्यपदक मिळविले. या यशाबद्दल महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांनी महिला संघाचे अभिनंदन करून त्यांचा सत्कार केला.

यामध्ये ४०० के. व्ही. लोणीकंद-२ पुणे येथील अतिरिक्त कार्यकारी अभियंता मनिषा देसाई, सांघिक कार्यालय, मुंबईच्या सहायक अभियंता श्रध्दा वर्डीकर, अति उच्च दाब प्रकल्प मंडळ, पुणे येथील विदुला देवकते, २२० के. व्ही. शेंद्रा उपकेंद्र, छत्रपती संभाजीनगर येथील सहायक अभियंता हर्षदा जाधव, नागपूर येथील ममता भोयर यांनी महिला बुध्दीबळ स्पर्धेत घवघवीत यश प्राप्त केले.

महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे म्हणाले,`` महापारेषण कंपनीचे अधिकारी व कर्मचारी नेहमीच स्पर्धेमध्ये सहभागी होऊन आपले टीम स्पिरीट दाखवितात. विशेषतः महिला अधिकाऱ्यांनी केलेली ही कामगिरी नक्कीच कौतुकास्पद आहे. घर, कार्यालय सांभाळून त्यांनी मिळविलेले हे यश अन्य अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठीही प्रेरणादायी आहे. भविष्यातही दैनंदिन कामकाज सांभाळून महिलांनी मोठे यश प्राप्त करावे.``

प्रारंभी महापारेषणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर सर्व महिला अधिकाऱ्यांचा सत्कार महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) श्री. सुगत गमरे यांनी करून त्यांना भेटवस्तू दिली. याप्रसंगी जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे, संचालक (मानव संसाधन) यांचे विशेष कार्य अधिकारी श्री. महेश आंबेकर, श्रीमती रेणुका नाटके उपस्थित होते. पुण्याचे अधीक्षक अभियंता (स्थापत्य) श्री. संदीप हाके, प्रशिक्षक श्री. किशोर चौधरी यांचे महिला टीमला विशेष मार्गदर्शन लाभले

# महापारेषणमध्ये दिव्यांग दिनानिमित्त अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार

Follow us on :



महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीत (महापारेषण) दिव्यांग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. अभय रोही, उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. नितीन कांबळे, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे, संचालक (मानव संसाधन) यांचे विशेष कार्य अधिकारी तथा व्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. महेश आंबेकर, रेणुका नाटके उपस्थित होते. महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे म्हणाले,`` महापारेषण कंपनीने कायमच दिव्यांगाना आधार देण्याचे काम केले आहे. दिव्यांगापुढे अनेक आव्हाने आहेत, त्यांना तोंड देण्यासाठी महापारेषण कंपनीचा नेहमीच पुढाकार असतो. दिव्यांग अधिकारी व कर्मचारी गुणवत्तेमध्ये कुठेही कमी नाहीत. शासनाचाही दिव्यांगांकडे पाहण्याचा दृष्टिकोन नेहमीच सकारात्मक व संवेदनशील राहिला आहे.``

याप्रसंगी महापारेषणचे उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) तथा दिव्यांग समन्वय अधिकारी श्री. अभय रोही यांनी जागतिक दिव्यांग दिनानिमित्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. नितीन कांबळे यांनी प्रेरणादायी दिव्यांग अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या यशकथा सांगून दिव्यांग दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.

यावेळी कार्यकारी अभियंता श्री. पंकज कुलकर्णी व सहायक अभियंता श्री. बलराज परब यांचा महापारेषणचे मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. मंगेश शिंदे यांच्या हस्ते प्रातिनिधीक स्वरूपात सत्कार करून त्यांना भेटवस्तू देण्यात आली. श्री. कुलकर्णी व श्री. परब यांनीही यावेळी महापारेषण कंपनी वेळोवेळी पाठिंबा देऊन कार्याचा गौरव करीत असल्याबद्दल आभार मानले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन संचालक (मानव संसाधन) यांचे विशेष कार्य अधिकारी तथा व्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. महेश आंबेकर यांनी केले.



**मुंबई :** महापारेषणच्या सांघिक कार्यालयामध्ये भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून संविधान दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी डावीकडून मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, श्री. भूषण बल्लाळ, पीयूष शर्मा, संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर, श्री. किशोर गरूड, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार, संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर.

## संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन

# महापारेषणमध्ये संविधान दिवस साजरा

Follow us on :

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये (महापारेषण) भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून संविधान दिवस साजरा करण्यात आला. सुरूवातीला महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार यांच्या उपस्थितीत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले.

यावेळी संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर, संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर, मुख्य अभियंता श्री. महेंद्र वाळके, श्री. भूषण बल्लाळ, श्री. पीयूष शर्मा, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती अंजू गुप्ता, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे, महाव्यवस्थापक (मनुष्यबळ नियोजन) श्री. राजू गायकवाड, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी, उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. नितीन कांबळे, श्री. किशोर गरूड, अधीक्षक अभियंता श्रीमती ज्योती चिमटे, श्री. सचिन खडगी, उपमुख्य दक्षता अधिकारी श्री. प्रशांत गोरडे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. सतिश जाधव यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती-निवृत्ती माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२४

### नियुक्ती

| अ.क्र. | नाव (सर्वश्री) | पद | पदस्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | मिलिंद देवळे | अधीक्षक अभियंता (पारेषण) | राज्य भार प्रेषण केंद्र, ऐरोली | ०५.१०.२०२४ |
| २ | पांडुरंग सुडे | अधीक्षक अभियंता (पारेषण) | प्रकल्प योजना विभाग, मुख्य कार्यालय, मुंबई | ०४.१०.२०२४ |
| ३ | जयवंत कोकाटे | अधीक्षक अभियंता (पारेषण) | अउदा प्रकल्प मंडल, नागपूर | १०.१०.२०२४ |

## संगीतमय नाट्याविष्कार



**कराड :** महापारेषणच्या कराड आंतरमंडलीय नाट्यस्पर्धेत स्थापत्य मंडल कोल्हापूर परिमंडलाच्या 'पगला घोडा' या नाटकाने प्रथम क्रमांक पटकावला. याप्रसंगी विजेत्यांसमवेत महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण, कराडच्या मुख्य अभियंता श्रीमती शिल्पा कुंभार, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे, अधीक्षक अभियंता तथा कराडचे नाट्य सचिव श्री. चिदाप्पा कोळी, अधीक्षक अभियंता श्री. प्रांजल कांबळे, श्री. श्रीकृष्ण नवलाखे, श्री. अशोक सागारे, श्री. संजय किंकर व अन्य अधिकारी

### "नेटवर्क २४x७" ला व्दितीय क्रमांक; कौस्तुभ भालघरे व वैशाली कांबळेचा उत्कृष्ट अभिनयासाठी गौरव

# कराड आंतर-मंडलीय नाट्यस्पर्धेत 'पगला घोडा' प्रथम

Follow us on :

महापारेषणच्या कराड आंतरमंडलीय नाट्यस्पर्धेत स्थापत्य मंडल कोल्हापूर परिमंडलाच्या 'पगला घोडा' या नाटकाने प्रथम क्रमांक पटकावला. कोल्हापूर मंडलच्या 'नेटवर्क २४x७' या नाटकाला व्दितीय क्रमांक मिळाला. या स्पर्धेत कराड मंडलाचे श्री. कौस्तुभ भालघरे यांना उत्कृष्ट अभिनयासाठी आणि कोल्हापूर स्थापत्य मंडलाच्या श्रीमती वैशाली कांबळे यांना उत्कृष्ट अभिनेत्री म्हणून गौरवण्यात आले.



सातारा जिल्ह्यातील कराड येथील यशवंतराव चव्हाण स्मृतीसदनमध्ये (टाऊन हॉल) आंतरमंडलीय नाट्यस्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत महापारेषण कंपनीतील पाच जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी वर्गाने विविध मंडलांमार्फत तीन नाटके सादर केली. यामध्ये कोल्हापूर परिमंडलाच्या "पगला घोडा" या नाटकाने प्रथम क्रमांक पटकावला. कोल्हापूर मंडलच्या 'नेटवर्क २४x७' या नाटकाला व्दितीय क्रमांक मिळाला.

या स्पर्धेचे पारितोषिक वितरण महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून कराडच्या मुख्य अभियंता श्रीमती शिल्पा कुंभार, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे, अधीक्षक अभियंता तथा कराडचे नाट्य सचिव श्री. चिदाप्पा कोळी आदी उपस्थित होते.

या स्पर्धेचे परीक्षक म्हणून सांगलीचे श्री. हर्षा बागल, कोल्हापूरचे श्री. संजय हळदीकर आणि सांगलीचे श्री. भास्कर ताम्हणकर यांनी काम पाहिले. या कार्यक्रमाचे आयोजन कराड परिमंडळाच्या मुख्य अभियंता श्रीमती शिल्पा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक अभियंता श्री. चिदाप्पा कोळी, अधीक्षक अभियंता श्री. प्रांजल कांबळे, अधीक्षक अभियंता श्री. श्रीकृष्ण नवलाखे, अधीक्षक अभियंता श्री. अशोक सागारे, अधीक्षक अभियंता श्री. संजय किंकर, सहाय्यक महाव्यवस्थापक (विवले) श्री. राजेश केळवकर, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा. सं.) श्री. प्रशांत चौधरी यांनी केले.

याप्रसंगी महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण यांनी उपस्थितींना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, ''ज्यांना पारितोषिक मिळाले त्यांनी यापेक्षा सुंदर काम करण्यासाठी कायम प्रयत्न करावेत. तर ज्यांना पारितोषिक नाही मिळाले, त्यांनीही पुढील स्पर्धेसाठी जोरदार तयारी करावी. त्याचप्रमाणे या नाटकातून जी आपण ऊर्जा घेणार आहात, त्याचा उपयोग आपल्या कामाच्या ठिकाणी करावा.''

### स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :

**उत्तेजनार्थ पारितोषिक**

**कलाकार**

१ श्री. सुनील बंडगले, २. श्री. प्रवीण पुजारी
३. श्री. पृथीराज सावंत

**बालकलाकार**

विदा दुमनाके, निविदा दुमनाके

**रंगभूषा/वेशभूषा**

१. श्रीमती. सुनिता कुलकर्णी, श्रीमती स्वाती भोसले, श्रीमती चित्रा शिंदे, (अबुटभर)
२. श्री. दामोदर देशपांडे, श्री. प्रताप पाटील (पगला घोडा)

**संगीत**

१. श्री. चंद्रकांत भरमगुंडे, श्री. संदीप पाटील (अबुटभर)
२. श्री. अभय ढमाले, श्री. अभिजित पाटील (पगला घोडा)

**प्रकाश योजना**

१. श्री. श्रीकांत पुजारी, श्री. दत्तात्रेय बोबडे (अबुटभर)
२. श्री. रणजीत पाटील, श्री. अनुप रसाळ (पगला घोडा)

**नेपथ्य**

१. श्री. राहुल दिंडे, २. श्री. प्रशांत मोहन, श्री. सुनित काटकर

**अभिनय लक्षवेधी (पुरुष)**

श्री. जीवन कांबळे, अभिनय लक्षवेधी (स्त्री) श्रीमती स्वाती घोलप

**अभिनय (पुरुष)**

श्री. कौस्तुभ भालघरे (अभुटभर) प्रथम
श्री. अमित कुलकर्णी (व्दितीय)

**अभिनय (स्त्री)**

१. श्रीमती वैशाली कांबळे (पगला घोडा)
२. श्रीमती श्रुतिका जाधव

**दिग्दर्शक**

१. श्री. संजय किंकर (पगला घोडा )
२. श्री. आफताब खान (नेटवर्क 24x7)

**नाटक निर्माता**

१. पगला घोडा, २. नेटवर्क 24x7
३. अभुटभर


**संपादक : डॉ. मिलिंद आवताडे, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)**
E-mail : prohr@mahatransco.in
**पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं.सी.-१९, ई-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)**

Printed & Published by **Dr.Milind Awatade** PRO for **Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,** Printed at **Jyotirling Enterprises :** 315-B. Deen Bldg. Compound, Shop No. 32, N.M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 23002574 & Published at Prakashganga, Bandra-Kurla Complex, Mumbai - 400 051. The Company accepts no responsibility for the matter published in the journal.